ePaper

**युद्ध पुन्हा भडकणार? इराणकडून कुवेत आणि बहारीनवर भीषण क्षेपणास्त्र हल्ला**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™





पान 3 वरुन...

चिंचवड यात्रेत 'मेड इन पाकिस्तान' चादरीची विक्री?

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 07 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तळकोकणात वरुणराजाचे आगमन; लवकरच उर्वरित महाराष्ट्रात बरसणार

# मान्सून महाराष्ट्रात दाखल.!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**राज्यवासींची प्रतीक्षा अखेर संपली असून मान्सूनने शनिवारी तळकोकणातून महाराष्ट्रात प्रवेश केला आहे. हवामान विभागाने मान्सूनच्या वाटचालीची माहिती दिली असून राज्यातील मुंबईसह उर्वरित भागातही लवकरच मान्सून दाखल होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे राज्यातील नागरिकांना लवकरच उष्णतेपासून दिलासा मिळेल. काहीभागात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज असून या दरम्यान सोसाट्याचा वाराही वाहण्याची शक्यता आहे. मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी हवामान स्थिती अनुकूल आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली.**





### दरम्यान, गेल्या वर्षी

२४ मे रोजी केरळमध्ये दाखल झालेला मान्सून २५ मे रोजी तळकोकणात दाखल झाला होता. तर मुंबई येथे २६ मे रोजी मान्सूनचे आगमन झाले होते. यावर्षी केरळ येथे ४ जून रोजी दाखल झालेला मान्सूनने २४ तासात गोव्यापर्यंत मजल मारली होती. तर तळकोकणात या दिवशी मान्सूनचे आगमन झाले होते. यंदा जून महिन्यात पर्जन्यमान कमी असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे, त्यामुळे मान्सूनची पुढील वाटचाल कशी असेल याकडे नागरिकांसह बळीराज्याचे लक्ष लागले आहे.



यंदा सरासरी वेळेच्या ३ दिवस उशिरा म्हणजेच ४ जून रोजी मोसमी वारे केरळमध्ये दाखल झाले. त्यांनतर मोसमी वाऱ्यांची वाटचाल वेगाने उत्तरेच्या दिशेने होऊन शुक्रवार, ५ जून रोजी कर्नाटक, तामिळनाडू तसेच नैऋत्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये पुढे सरकल्याची माहिती हवामान विभागाने दिली. मान्सूनने अरबी समुद्राच्या आणखी काही भागांसह गोव्यातील काही भागांतही प्रवेश केला होता. त्यामुळे राज्यात लवकरच मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त केला जात होता. त्यानुसार, मोसमी वाऱ्यांनी शनिवारी संपूर्ण गोवा प्रदेश व्यापला असून राज्यातील तळकोकणात हजेरी लावली आहे.

यंदा तीव्र उष्णतेचा, तसेच विदर्भासह अनेक भागांना तीव्र उष्णतेच्या लाटेसदृश्य स्थितीचा सामान करावा लागला. त्यानंतर वादळी पावसामुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळत होता. मात्र संपूर्ण राज्याचे लक्ष मान्सूनकडे लागले होते. अखेर मान्सूनने राज्यात प्रवेश केला असून पुढील काही दिवसात मान्सून संपूर्ण राज्य व्यापेल असा अंदाज आहे. तळकोकणात हजेरी लावल्यानंतर अनेकदा मान्सून वेगाने मुंबईसह उत्तर कोकणात दाखल होतो. सध्या मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी हवामान स्थिती अनुकूल असल्याची माहिती, हवामान विभागाने दिली. लवकरच मान्सूनचे आगमन मुंबईत होईल, असा अंदाज आहे.

### उष्णतेतून दिलासा!

महाराष्ट्रातील तळकोकणात मान्सूनचे आगमन झाले असून पुढील काही दिवसांत तो संपूर्ण राज्य व्यापण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.
मान्सूनच्या आगमनामुळे उष्णतेची तीव्रता कमी होऊन राज्यवासीयांना दिलासा मिळणार आहे.
मुंबईसह उत्तर कोकणातही लवकरच मान्सून दाखल होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

# फुगेवाडी दारूकांडानंतर मोठा 'ॲक्शन प्लॅन'!

## अवैध दारूविरोधात पोलीस, उत्पादन शुल्क विभागाचा संयुक्त प्रहार

**महाईन्यूज । पुणे**

**दापोडीतील फुगेवाडी आणि पुण्यातील हडपसर येथील विषारी दारू प्रकरणानंतर पिंपरी-चिंचवड, पुणे शहर आणि पुणे ग्रामीण परिसरातील अवैध दारू धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आता पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी एकत्र येत 'ॲक्शन प्लॅन' तयार केला आहे. अवैध हातभट्टी, भेसळयुक्त दारू आणि बेकायदेशीर दारू विक्रीच्या संपूर्ण साखळीतील प्रत्येक दुव्यावर थेट संयुक्त प्रहार करण्याचा मोठा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.**



पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली ५ जून रोजी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात ही बैठक पार पडली. अवैध दारूच्या समूळ उच्चाटनासाठी आयोजित बैठकीला सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त सारंग आवाड, बसवराज तेली, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक अतुल कानडे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सह आयुक्त गिरीश हुकरे, पुण्याचे पोलीस उपायुक्त चिलूमुल्ला रजनीकांत, पिंपरी-चिंचवडचे गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार उपस्थित होते.

या बैठकीत प्रामुख्याने भेसळयुक्त दारू, अवैध दारू गाळणे आणि शहरासह ग्रामीण भागात पसरलेल्या अवैध दारू विक्रीच्या जाळ्या उद्ध्वस्त करण्यावर सविस्तर चर्चा झाली. या तिन्ही क्षेत्रांतील वाढत्या गुन्हेगारीला चाप लावण्यासाठी गुप्त माहितीची आपापसात देवाणघेवाण करणे आणि संयुक्तपणे कडक अंमलबजावणी अधिक मजबूत करण्यावर सर्व अधिकाऱ्यांनी एकमत केले. या सर्व विभागांच्या संयुक्त पुढाकारामुळे आगामी काळात पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण पुणे जिल्ह्यात अवैध दारू विक्रेते आणि हातभट्ट्यांवर मोठ्या कारवायांची मालिका पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत बेकायदेशीर दारू विक्री आणि वाहतुकीवर अमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा व स्थानिक पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.

### विदेशी दारू जप्त

आळंदीतील च-होली येथे गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाने पाच लाख रुपये किमतीच्या मोटारीसह २२ हजार ५ रुपयांची विदेशी दारू जप्त करत एकाला ताब्यात घेतले. नाणेकरवाडी येथे स्कुटीवरून ३२ हजार रुपयांच्या देशी दारूची वाहतूक करताना एकाला दक्षिण चाकण पोलिसांनी पकडले. तसेच, रावेत परिसरात दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये मोपेड दुचाकीवरून बिअरची वाहतूक करणाऱ्या दोघांना रावेत पोलिसांनी रंगेहात पकडले.

### गावठी दारू बाळगणाऱ्याला भोसरी येथे अटक

चिखलीतील किराणा दुकानातून पाच हजार ८८० रुपयांच्या दारूसह एकाला ताब्यात घेतले. चिंबळी येथे राहत्या घरात पाच हजार २५० रुपयांची हातभट्टी दारू बाळगल्याप्रकरणी एका महिलेवर आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला गेला. तसेच मोशीतील लेबर कॅम्पमध्ये तीन हजार रुपयांची गावठी दारू बाळगणाऱ्या एका विधीसंघर्षित बालकाला एमआयडीसी भोसरी पोलिसांनी ताब्यात घेतले. या सर्व प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

## तहसीलदार प्रशांत बेडसे यांना दिलासा; उच्च न्यायालयाकडून स्थगिती

**महाईन्यूज । पुणे**

**शासकीय कर्तव्य बजावत असताना प्रामाणिक अधिकाऱ्यांना विनाकारण वेठीस धरणाऱ्या आणि खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या प्रवृत्तींना खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी उच्च न्यायालयाच्या माध्यमातून एक सणसणीत कायदेशीर चपराक लगावली आहे.**



मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शनिवारी (दि.६ ) सुट्टीचा दिवस असूनही या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून विशेष 'तातडीची सुनावणी' घेतली. न्यायमूर्ती प्रफुल्ल एस. खुबळकर यांच्या खंडपीठाने वरोरा दंडाधिकारी न्यायालयाने अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करण्यासाठी दिलेल्या एकतर्फी आदेशाला तत्काळ स्थगिती दिली आहे.

या निकालामुळे तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्यासह अनेक प्रामाणिक अधिकाऱ्यांना मोठे संरक्षण मिळाले असून, विनाकारण त्रास देणाऱ्या प्रवृत्तींना भक्कम जरब बसली आहे. वरोरा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) यांनी ०४ जून २०२६ रोजी भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम ६१(२), १९९, ३१६(५) आणि ३१८(४) अंतर्गत अनेक सरकारी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.

या अन्यायकारक आदेशाविरुद्ध तहसीलदार प्रशांत बेडसे (खेड) आणि तहसीलदार अविनाश शेंबटवाड (गडचिरोली) यांनी अत्यंत तत्परतेने उच्च न्यायालयात दाद मागितली. उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात दंडाधिकारी न्यायालयाच्या कार्यपद्धतीवर अत्यंत गंभीर निरीक्षणे नोंदवली आहेत. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, मूळ तक्रारदाराने केवळ 'मोघम आरोप' केले होते आणि कोणतेही बनावट दस्तऐवज सादर केले नसल्याचे खुद्द दंडाधिकाऱ्यांनी मान्य करूनही अधिकाऱ्यांवर थेट एफआयआरचे आदेश दिले.

याशिवाय या प्रकरणात कोणतेही अधिकारक्षेत्र नसताना आणि शासनाची पूर्वपरवानगी नसताना हे आदेश पारित करण्यात आले होते. हा तहसीलदार बेडसे यांच्या वकिलांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य मानला. या बेकायदेशीर आदेशामुळे अधिकाऱ्यांच्या सेवेवर आणि कारकिर्दीवर गंभीर परिणाम होऊ शकतो, याची दखल घेत उच्च न्यायालयाने हा आदेश वरवर पाहता 'असमर्थनीय' असल्याचे स्पष्ट केले.

या सुनावणीचे सर्वात मोठे यश म्हणजे, उच्च न्यायालयाने केवळ याचिकाकर्त्यांनाच नव्हे, तर ज्या सर्व सरकारी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते, त्या सर्वांच्या कारवाईला 'अंतरिम दिलासा' देत स्थगिती दिली आहे. तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या या आक्रमक, धडाडीच्या आणि 'दबंग' भूमिकेमुळे संपूर्ण महसूल आणि प्रशासकीय वर्तुळातून त्यांचे मोठे कौतुक होत आहे.

### भुरट्या तक्रारदारांचे धाबे दणाणले


या ऐतिहासिक निकालामुळे, माहिती अधिकाराचा (RTI) गैरवापर करून ब्लॅकमेल करणारे तोतया कार्यकर्ते, खोटे व्हिसल-ब्लोअर आणि प्रशासनाला वेठीस धरणाऱ्या भुरट्या तक्रारदारांचे धाबे दणाणले आहेत. "प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना खोट्या गुन्ह्यांची भीती दाखवून नामोहरम करता येणार नाही. जर कोणी कायद्याचा गैरवापर करून अधिकाऱ्यांचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला, तर त्याला त्याच कायद्याच्या चौकटीत उच्च न्यायालयापर्यंत खेचून त्याची जागा दाखवून दिली जाईल.

# चिंचवड यात्रेत ‘मेड इन पाकिस्तान’ चादरीची विक्री?

## व्हायरल व्हिडीओनंतर पोलिसांची तत्काळ दखल; स्वतंत्र पथक तैनात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**श्री मोरया गोसावी मंदिराजवळ संकष्टी चतुर्थीनिमित्त भरलेल्या यात्रेत ‘मेड इन पाकिस्तान’ अशी नोंद असलेली चादर विक्रीस आल्याचा दावा एका महिलेने केला आहे. यासंदर्भातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.**




व्हिडीओमध्ये संबंधित महिला यात्रेतून खरेदी केलेली चादर दाखवत असून ती धुतल्यानंतर एका कोपऱ्यात लपविण्यात आलेले लेबल आढळल्याचा दावा करत आहे. त्या लेबलवर ‘मेड इन पाकिस्तान’ असा उल्लेख असल्याचे व्हिडीओमध्ये सांगण्यात आले आहे.

या प्रकारामुळे यात्रांमध्ये आणि स्थानिक बाजारपेठांमध्ये विकल्या जाणाऱ्या वस्तूंच्या उगमाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सोशल मीडियावर काहींनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून काहींनी वस्तूच्या लेबलची आणि मूळ स्रोताची पडताळणी झाल्यानंतरच निष्कर्ष काढावेत, अशी भूमिका घेतली आहे.

दरम्यान, चिंचवड पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत स्वतंत्र पथक नियुक्त केले आहे. गुन्हे शाखेकडून संबंधित चादर विक्रेत्याचा शोध सुरू असून मंदिर परिसरात संशयास्पद अथवा अवैध वस्तूंची विक्री होणार नाही यासाठी महापालिकेलाही सूचना देण्यात आल्या आहेत.

> "या प्रकरणाच्या तपासासाठी स्वतंत्र पथक तैनात करण्यात आले आहे. संबंधित विक्रेत्याचा शोध सुरू असून नागरिकांनी माहिती असल्यास पोलिसांशी संपर्क साधावा."
> - रणजित जाधव, पोलिस निरीक्षक

### पडताळणीशिवाय निष्कर्ष टाळा!

व्हायरल व्हिडीओमधील चादरीवर ‘मेड इन पाकिस्तान’ असा उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला असला तरी संबंधित वस्तूचा मूळ स्रोत, आयात प्रक्रिया आणि विक्रेत्याची भूमिका याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही वस्तू खरेदी करताना उत्पादनावरील तपशील, उत्पादक कंपनीचे नाव आणि मूळ देश याची खात्री करूनच खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पिंपरी-चिंचवडकरांचा जीव मुठीत! वर्षाला २९ हजार नागरिकांना कुत्र्यांचा चावा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात मोकाट आणि भटक्या कुत्र्यांची समस्या कायम आहे. अश्या कुत्र्यांकडून नागरिकांना चावा घेतल्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यातच शहरातील प्राणीप्रेमीकडून त्यांना अन्न मिळत असल्याने शहरात कुत्र्यांची संख्या वाढत आहे. शहरात अंदाजे एक लाख भटक्या कुत्र्यांची संख्या आहे. या कुत्र्यांमुळे शहरातील नागरिकांचे बाहेर फिरणे मुश्किल झाले आहे.**



टपऱ्या, खाद्यपदार्थ, चायनीज विक्रेते, नागरिक व कुत्रीप्रेमींकडून तसेच, उघड्यावर व कचराकुंडीत सहजपणे खाद्य मिळत असल्याने मोकाट व भटक्या कुत्र्यांची संख्या वाढतच आहे. रात्रीच्या वेळी वाहने व पादचाऱ्यांवर कुत्री धावून जातात. अचानक अंगावर कुत्री आल्याने त्यांच्या तावडीतून सुटण्यासाठी वाहन पळविताता किंवा पळताना अपघात होतात.

रात्रीच्या अंधारात रस्त्यांवर नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन जावे लागते. कुत्र्यांच्या चाव्यामुळे तसेच, अपघात होऊन जखमी होण्याच्या घटना वाढल्या आहेत. विशेषतः लहान मुलांवर हल्ला करून त्यांचा चावे घेण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. वर्षाला २९ हजार जणांना कुत्री चावत असल्याचे महापालिकेच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडून मोकाट कुत्री पकडून त्याच्यावर नसबंदी (निर्बिजीकरण) शस्त्रक्रिया केली जाते. एका शस्त्रक्रियेसाठी महापालिका सुमारे १ हजार रूपये खर्च करते. महापालिकेकडून दिवसाला अवघ्या ८ ते १० कुत्र्यांवर ही शस्त्रक्रिया केली जाते. त्यामुळे एक लाख भटकी कुत्री असलेल्या एवढ्या मोठ्या शहरातील कुत्र्यांची संख्या नियंत्रणात कशी येणार हा मोठा प्रश्न आहे.

त्यामुळे शहरवासीयांकडून संताप व्यक्त केला जात आहे. भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी महापालिका प्रशासन अयपशी ठरल्याचे स्पष्ट होत आहे. तर, भटक्या आणि मोकाट कुत्र्यांना अन्न व खाद्य देणाऱ्या नागरिकांनी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागात नोंदणी करावी, असे आवाहन महापालिकेने केले होते. त्याला प्राणिप्रेमींनी प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे शहरात किती नागरिक, संस्था भटक्या कुत्र्यांना अन्न देतात, याची नोंद महापालिकेकडे नाही.

### तक्रारींवर कारवाई होत नसल्याने संताप

महापालिकेकडे तसेच, सारथी हेल्पलाईनवर तक्रार केल्यानंतर काही तक्रारींवर कारवाई न करताच ती बदं केली जाते. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत कुत्री पकडण्यासाठी पथक पाठविले जाते. सायंकाळनंतर कुत्री त्रास देत असल्यास त्या तक्रारींची दखल घेतली जात नाही. महापालिकेच्या कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे

### निर्बिजीकरणाचा वेग अपुरा

महापालिकेकडून भटक्या कुत्र्यांवर नियंत्रणासाठी निर्बिजीकरण मोहीम राबविली जाते. एका शस्त्रक्रियेसाठी सुमारे एक हजार रुपये खर्च होत असला तरी दिवसाला केवळ ८ ते १० कुत्र्यांवरच शस्त्रक्रिया केली जाते. शहरातील भटक्या कुत्र्यांची संख्या लक्षात घेता हा वेग अत्यंत अपुरा असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.





## भूमिका

**कर्नाटकमध्ये काँग्रेसने मुख्यमंत्रीपदाची धुरा डी. के. शिवकुमार यांच्याकडे सोपवण्याचा घेतलेला निर्णय हा राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा आणि दूरदृष्टी दाखवणारा मानला जात आहे. गेल्या काही वर्षांत काँग्रेस नेतृत्वाच्या निर्णयांवर अनेकदा टीका झाली असली, तरी हा निर्णय पक्षाच्या भविष्यासाठी सकारात्मक ठरू शकतो.**

# कर्नाटकातील नेतृत्वबदल : काँग्रेसचा शहाणा राजकीय डाव



डी. के. शिवकुमार यांनी काँग्रेसच्या कठीण काळात पक्षाशी निष्ठा राखली. केंद्रीय यंत्रणांच्या चौकशा, राजकीय दबाव आणि विविध अडचणींना सामोरे जात असतानाही त्यांनी पक्ष सोडला नाही.

अनेक नेत्यांनी सत्तेच्या मोहापायी पक्षांतराचा मार्ग स्वीकारला असताना शिवकुमार काँग्रेससोबत ठामपणे उभे राहिले. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या विजयामध्ये त्यांच्या संघटनकौशल्याचा आणि परिश्रमांचा मोठा वाटा होता. त्यामुळे त्यांना मुख्यमंत्रीपद देणे हा त्यांच्या निष्ठेचा योग्य सन्मान मानला जात आहे.

काँग्रेसने यापूर्वी राजस्थान आणि पंजाबमध्ये नेतृत्वबदलाच्या बाबतीत चुका केल्या होत्या. राजस्थानमध्ये सचिन पायलट यांना डावलून अशोक गेहलोत यांच्यावर विश्वास ठेवण्यात आला, तर पंजाबमध्ये नेतृत्वबदलाचा प्रयोग यशस्वी ठरला नाही.

या अनुभवांतून धडा घेत काँग्रेसने कर्नाटकात वेळेवर नेतृत्वबदल केला आहे. त्यामुळे पक्षातील नाराजी कमी होण्यास मदत होईल. कर्नाटकाचा राजकीय इतिहास पाहता, तेथे जवळपास प्रत्येक निवडणुकीनंतर सत्ताबदल होत आला आहे. अशा परिस्थितीत निवडणुकांपूर्वी मुख्यमंत्री बदलल्याने सत्ताविरोधी वातावरणाचा प्रभाव कमी करण्याची संधी काँग्रेसला मिळू शकते.

सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील सरकारला काही प्रमाणात स्थिरता लाभली होती; मात्र नव्या नेतृत्वामुळे प्रशासनात आणि पक्षसंघटनेत नवचैतन्य निर्माण होण्याची शक्यता आहे. या निर्णयाला सामाजिक आणि जातीय समीकरणांचीही जोड आहे. शिवकुमार हे प्रभावी वोक्कलिग समाजाचे नेते आहेत. भाजप आणि जनता दल (सेक्युलर) यांच्यातील समीकरणांच्या पार्श्वभूमीवर वोक्कलिग समाजाला आकर्षित करण्यासाठी काँग्रेसचा हा प्रयत्न महत्त्वाचा ठरू शकतो. त्याचबरोबर दलित समाजातील डॉ. जी. परमेश्वरा यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड करून सामाजिक समतोल साधण्याचाही प्रयत्न करण्यात आला आहे. काँग्रेससमोर केवळ भाजपचे आव्हान नाही, तर पक्षांतर्गत नेतृत्व आणि हायकमांड संस्कृतीचेही आव्हान आहे.

अनेक राज्यांमध्ये स्थानिक नेतृत्वाला संधी न दिल्याने काँग्रेसला फटका बसला आहे. कर्नाटकातील निर्णय मात्र स्थानिक नेतृत्वावर विश्वास दाखवणारा आहे. त्यामुळे पक्षात नव्या नेतृत्वाला वाव मिळण्याचा संदेश गेला आहे. एकूणच, कर्नाटकमधील नेतृत्वबदल हा केवळ मुख्यमंत्री बदलण्याचा निर्णय नसून पक्षसंघटना मजबूत करण्याचा आणि आगामी निवडणुकांसाठी नव्या रणनीतीचा भाग आहे.

या निर्णयाचे यश भविष्यात ठरेल; मात्र काँग्रेसने वास्तव ओळखून योग्य वेळी घेतलेला हा शहाणा निर्णय निश्चितच महत्त्वाचा मानावा लागेल.

## प्रासंगिक »

### महापुरुष

**आचार्य विनोबा भावे हे आधुनिक संत म्हणून ओळखले जातात. एकदा एक माणूस त्यांच्याकडे आला आणि म्हणाला, "महाराज, मला दारूचे व्यसन सोडायचे आहे, पण दारू मला सोडत नाही.**

" विनोबाजींनी त्याला दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी तो आला आणि बाहेरून हाक मारली. आतून विनोबाजी म्हणाले, "मी बाहेर येतो, पण हा खांब मला सोडत नाही." त्या माणसाला आश्चर्य वाटले. त्याने आत डोकावून पाहिले तर विनोबाजी खांबाला घट्ट धरून बसले होते. तो हसत म्हणाला, "महाराज, तुम्हीच खांबाला धरले आहे,

खांबाने तुम्हाला नाही." हे ऐकून विनोबाजी खांब सोडून उभे राहिले आणि म्हणाले, "जसे मी खांबाला धरून ठेवले होते, तसेच तू दारूला धरून ठेवले आहेस. दारूने तुला पकडलेले नाही. तू ठामपणे सोडण्याचा निर्णय घेतलास तर व्यसन आपोआप सुटेल." हे ऐकून त्या माणसाला आपली चूक समजली आणि त्याने दारू सोडण्याचा निश्चय केला.

- तात्पर्य : दृढ निश्चय आणि इच्छाशक्ती असेल तर कोणतेही व्यसन किंवा वाईट सवय सोडता येते.

दिल्लीतील एका हॉटेलमध्ये लागलेल्या भीषण आगीत २१ जणांचा मृत्यू झाला, तर बिहारमधील मुजफ्फरपूर येथील खासगी रुग्णालयातील आगीत पाच रुग्णांना जीव गमवावा लागला.

# बेफिकिरीच्या ज्वाळांत हरवलेले जीव

या घटना केवळ अपघात नसून निष्काळजीपणा, भ्रष्टाचार आणि प्रशासनाच्या उदासीनतेचे विदारक चित्र आहेत. अशा दुर्घटनांमुळे एक प्रश्न पुन्हा ऐरणीवर येतो—या आगी खरोखर लावतो कोण? दिल्लीतील हॉटेलला फक्त सहा खोल्यांची परवानगी असताना तेथे तब्बल २५ खोल्या उभारण्यात आल्या होत्या. अग्निसुरक्षा प्रमाणपत्र नव्हते, आवश्यक परवानग्याही घेतलेल्या नव्हत्या. तरीही हे बांधकाम वर्षानुवर्षे सुरू राहिले. याचा अर्थ केवळ मालक दोषी नसून त्याला मूक संमती देणारी यंत्रणाही तितकीच जबाबदार आहे.

मुजफ्फरपूरमधील रुग्णालयातही अग्निसुरक्षा व्यवस्था अपुरी होती. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्यानंतर रुग्णांना वाचवण्यासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध नव्हत्या. परिणामी उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आपल्या देशात दुर्घटना घडल्यानंतर चौकशी समित्या नेमल्या जातात, निलंबनाची घोषणा होते आणि काही दिवस चर्चाही रंगते.




मात्र काही काळानंतर सर्व काही पूर्ववत होते. प्रतिबंधात्मक उपाययोजनांकडे मात्र सातत्याने दुर्लक्ष केले जाते. इमारती कोसळल्यानंतर बांधकाम नियम आठवतात, विषारी दारूने मृत्यू झाल्यावर कारवाई होते आणि आगीनंतर अग्निसुरक्षेची चर्चा सुरू होते. पण अपघात टाळण्यासाठी आवश्यक असलेली दक्षता मात्र दिसत नाही. देशभरातील अनेक महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अग्निशमन विभाग मनुष्यबळ, उपकरणे आणि निधीअभावी अपुऱ्या क्षमतेने कार्यरत आहेत. शहरांचा विस्तार झपाट्याने होत असताना सुरक्षाव्यवस्था मात्र त्याच गतीने विकसित झालेली नाही. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे फावते आणि सामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ केला जातो. अशा घटनांमध्ये केवळ मालकांनाच नव्हे, तर परवानगी देणारे अधिकारी, तपासणी यंत्रणा आणि दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागांनाही जबाबदार धरले पाहिजे. कठोर शिक्षा आणि उत्तरदायित्व निश्चित झाल्याशिवाय परिस्थिती बदलणार नाही. या काळोखात आशेचा किरणही दिसतो. दिल्लीतील आगीत अनेक नागरिकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून अडकलेल्यांना बाहेर काढले. धर्म, जात, भाषा किंवा राष्ट्रीयत्व यांचा विचार न करता त्यांनी मानवतेचे दर्शन घडवले. अशा संवेदनशील नागरिकांमुळेच समाजातील माणुसकी जिवंत आहे. तथापि, केवळ धाडसी बचावकार्य पुरेसे नाही. अशा दुर्घटना घडूच नयेत यासाठी व्यवस्था जागी होणे गरजेचे आहे. अन्यथा निष्काळजीपणा, भ्रष्टाचार आणि बेफिकिरीची ही आग भविष्यात आणखी अनेक स्वप्ने राख करून टाकेल. त्यामुळे आज सर्वात महत्त्वाचा प्रश्न हाच आहे—ही आग लावणाऱ्यांना रोखणार कोण?

## ।। अभंगवाणी ।।



हासों रुसों आतां वाढवूं आवडी ।
अंतरींची गोडी अवीट ते ॥१॥

सेवासुखें करूं विनोदवचन ।
आम्ही नारायण एकाएकीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोकण महाविकास आघाडीत विसंवाद

## विधानपरिषद निवडणुकीतही महाविकास आघाडीतील विसंवाद आणि मतभेद उघड

**महाईन्यूज । अलिबाग**

**विधानसभा निवडणुकीपाठोपाठ विधान परिषद निवडणुकीतही महाविकास आघाडीतील विसंवाद आणि मतभेद उघड झाले आहेत. याचा फायदा महायुतीच्या अनिकेत तटकरे यांना झाला आहे. त्यांची विधान परिषदेसाठी बिनविरोध निवड झाली आहे.**



विधानसभा निवडणुकीत शेकापला महाविकास आघाडीत समावून घेण्यावरून शिवसेना ठाकरे गट नाखूष होता. त्यामुळे रायगड जिल्ह्यात शेकाप लढवत असलेल्या चारपैकी तीन ठिकाणी शिवसेना ठाकरे गटाने आपले उमेदवार उभे केले होते. ज्याचा परिणाम निवडणूक निकालावर दिसून आला. महाविकास आघाडीच्या मतांचे विभाजन महायुतीच्या पथ्यावर पडले आणि रायगड जिल्ह्यातील सातही मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार विजयी झाले होते.

विधान परिषदेच्या कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीत याचीच प्रचिती पुन्हा एकदा आली. महाविकास आघाडीकडून ही जागा शिवसेना ठाकरे गटाला सोडण्यात आली होती. शिवसेना ठाकरे गटाकडून बाळ माने यांना उमेदवारी देण्यात आली होती. पण तरीही शेतकरी कामगार पक्षाने आपले तीन उमेदवार निवडणुकीत उतरवले होते. त्यामुळे महाविकास आघाडीच्या मतांचे विभाजन होणे अटळ होते.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी झालेल्या नाट्यमय घडामोडीनंतर विरोधकांच्या सर्व उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज काढून घेतले. शेकापकडून अरविंद म्हात्रे, मानसी म्हात्रे आणि अनिल चोप्रा यांनी आपले अर्ज मागे घेतले. बाळ माने यांनी मंत्री नितेश राणे यांच्या समवेत जाऊन आपला उमेदवारी अर्ज माघारी घेतला. त्यामुळे महाविकास आघाडीवर बिनविरोध जागा सोडण्याची नामुष्की ओढावली.

महाविकास आघाडीकडे ही निवडणूक जिंकता येईल एवढे संख्याबळ नव्हते. ही वस्तुस्थिती होती. १०१८ पैकी ७०७ हून अधिक मते महायुतीच्या बाजूने होती. मात्र म्हणून घोडेबाजार रोखण्याचे कारण पूढे करून निवडणुकीच्या रणांगणातून काढता पाय घेतल्याने महाविकास आघाडीतील घटक पक्ष टिकेचे धनी ठरले आहेत. निवडणूक बिनविरोध झाल्याने, शिवसेना ठाकरे गटासह शेकापबाबतही नाराजी आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांमधील मतभेद आणि विसंवाद हे सातत्याने महायुतीच्या पथ्यावर पडत असल्याचे दिसून येत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा त्याचीच प्रचिती कोकणवासीयांना आली आहे. या घडामोडींमुळे महाविकास आघाडीतील समन्वयाचा आणि नेतृत्वाच्या निर्णय प्रक्रियेचाही प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर निवडणुकांमध्ये या मतभेदांचा राजकीय परिणाम कितपत होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर दुसरीकडे, विरोधकांतील विसंवादाचा फायदा घेत महायुतीने कोकणातील आपली राजकीय पकड अधिक मजबूत केल्याचे चित्र या निवडणुकीतून स्पष्ट झाले आहे.

### शिवसेना ठाकरे गट आणि शेकापमध्ये नाराजी

निवडणुक बिनविरोध झाल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने बाळ माने यांची पक्षातून हकालपट्टी केली. पण बाळ माने यांना निवडणुकीत उमेदवारी देण्याच्या निर्णयावरून आता पक्षात असंतोष दिसू लागला आहे. पक्षातील निष्ठावंतांना दूर ठेऊन बाळ माने यांच्यावर विश्वास टाकण्याचा निर्णय पक्षाच्या अंगलट आल्याची चर्चा सरू झाली आहे. दुसरीकडे उमेदवारी अर्ज मागे घ्यायला लावल्यामुळे शेकापमध्ये नाराजीचा सूर आहे. पक्षाच्या नेत्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्यास सांगितल्याने, नाराज झालेल्या अरविंद म्हात्रे यांनी पनवेल महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला आहे. पक्षाचे वरीष्ठ नेतेच तटकरे यांना मॅनेज झाल्याची चर्चा दबक्या आवाजात राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# जरांगेंसमोर सरकार लाचार? मराठा योजनांवर न्यायालयीन लढाई

**महाईन्यूज । मुंबई**

**मराठा समाजावर अशी कोणती वेळ आली, त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरण जाहीर करण्यात आले, असा प्रश्न उपस्थित करत ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी राज्य सरकार जरांगे यांच्यासमोर लाचार झाले आहे, अशी घणाघाती टीका केली. तसेच मराठा समाजासाठी जाहीर केलेल्या योजना राज्यघटनेचे उल्लंघन करणाऱ्या असून, त्याविरोधात न्यायालयीन लढाईसह तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.**



राज्य सरकारने मराठा समाजासाठी आठ योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रा. हाके यांनी पुण्यातील पत्रकार भवन येथे पत्रकार परिषद घेऊन त्यांची सविस्तर भूमिका स्पष्ट केली. तसेच सत्ताधाऱ्यांसह विरोधी पक्षातील ओबीसी नेत्यांवरही टीका केली.

प्रा. हाके म्हणाले, राज्य सरकार ओबीसींना बेदखल करत आहे. अण्णासाहेब पाटील महामंडळाला १ हजार कोटी रुपयांचा निधी दिला जात आहे, योजना जाहीर केल्या जात आहेत. मात्र, ओबीसी महामंडळाला अध्यक्ष नाही, कार्यालय नाही, ओबीसींच्या १८ महामंडळांच्या घोषणा निवडणुकीवेळी केल्या. पण त्याचे काहीच झाले नाही. त्या घोषणा चुनावी जुमला होत्या. ६० टक्के ओबीसींसाठी केवळ ०.६ टक्के निधी दिला जात आहे. जरांगे यांच्या आंदोलनाची दखल घेण्यासाठी आमदार, मुख्यमंत्री, प्रशासनाची लगबग वाढते. पण ओबीसींच्या प्रश्नाची दखल घेतली जात नाही. ओबीसींबाबतचा एक प्रश्न विचारायला महाराष्ट्रातील नेता पुढे येत नाही हे दुर्दैव आहे. त्यामुळे ओबीसींबाबत दुजाभावाची भूमिका आहे.मराठा समाजाला योजना देण्यामागे कोणता अभ्यास केला, काय निकष लावले आहेत, कुठल्या तत्त्वावर योजना देण्यात आल्या, कोणत्या समितीने त्याबाबत शिफारस केली होती याचे उत्तर सरकारने द्यावे.

### नेत्यांनी स्वतःला ओबीसी म्हणू नये

ओबीसी प्रश्नांवर सत्ताधारी, विरोधी पक्षातील एक नेता बोलत नाही. राज्यातल्या ओबीसी नेत्यांनी आवाज उठवून सरकारला 'सळो की पळो' करायला हवे. ओबीसींचे आरक्षण संपत असताना कोणीही बोलायला तयार नाही. चंद्रशेखर बावनकुळे, भुजबळ साहेब, गणेश नाईक, पंकजा मुंडे, संजय राठोड, गुलाबराव पाटील यांच्यापैकी कोणीही बोलत नाही. त्यामुळे त्यांनी स्वतःला ओबीसी म्हणवून घेऊ नये.



“ राज्य सरकार ओबीसींचा वापर केवळ मतांसाठी करून घेत आहे. जे ओबीसींना तेच मराठा समाजाला असे सरकारने म्हणणे अन्यायकारक आहे. त्यामुळे मराठा समाजाला दिलेल्या योजनांविरोधात न्यायालयात जाणार आहे, तसेच आंदोलन करणार आहे. ओबीसींच्या मनात सरकारच्या या धोरणांबद्दल प्रचंड चीड आहे. आम्ही कशाप्रकारे आमचा रोष दाखवून देऊ, हे येणाऱ्या काळात सरकारला कळेल.

- प्रा. लक्ष्मण हाके, ओबीसी नेते.

# दिल्लीत ‘कॉक्रोच जनता पार्टी’चे भव्य आंदोलन

## अभिजित दिपके यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**महाईन्यूज । नवीदिल्ली**

**विविध शैक्षणिक आणि भरती परीक्षांमधील गैरव्यवहार आणि पेपर फुटी मुद्द्यावरून देशातील तरुण वर्ग आक्रमक झाला आहे. ‘कॉक्रोच जनता पार्टी’चे (CJP) संस्थापक अभिजित दिपके आज सकाळी भारतात परतले असून, त्यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे या भव्य आंदोलनाचे नेतृत्व केले. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत हजारो विद्यार्थी आणि तरूणांनी या आंदोलनात सहभाग घेतला. या आंदोलनादरम्यान जंतर-मंतर परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती.**




आंदोलनाला संबोधित करताना अभिजित दिपके म्हणाले,“आपला हा लढा मोठा आहे. आम्ही गेल्या एका महिन्यापासून सोशल मीडियावर शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहोत. मात्र, कारवाई करण्याऐवजी आमचे सोशल मीडिया अकाउंट्स हॅक करणे आणि पोस्ट डिलीट करण्याचे काम केले जात आहे. तुम्ही आमच्या पोस्ट डिलीट करू शकता, पण आम्हाला इथून हटवू शकत नाही.” या आंदोलनादरम्यान दिपके यांच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आत्मचरित्र पाहायला मिळाले. याबाबतचे वृत्त ‘हिंदुस्तान टाइम्स’ या वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले आहे.

**आंदोलनकर्त्यांच्या ५ प्रमुख मागण्या –**

**१. केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा** – नीट पेपर लीक प्रकरण आणि सीबीएसईच्या ‘ऑन-स्क्रीन मार्किंग सिस्टम’मधील कथित अनियमिततेची जबाबदारी स्वीकारून शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा.

**२. योग्य प्रशिक्षणाशिवाय घाईघाईने डिजिटल शिक्षण नको** – शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करण्यापूर्वी शिक्षकांना त्याचे योग्य प्रशिक्षण आणि मूल्यमापन दिले जावे. डिजिटल प्रणालीमुळे होणारे गैरप्रकार आधी रोखले जावेत.

**३. मणिपूरमधील शिक्षण व्यवस्था पूर्ववत करा** – गेल्या तीन वर्षांपासून मणिपूरमध्ये सुरू असलेल्या अनौस्थेमुळे तेथील शाळा आणि महाविद्यालये विस्कळीत झाली आहेत. तेथील विद्यार्थ्यांचा मानसिक ताण कमी करून शिक्षण व्यवस्था तातडीने सुरळीत करावी.

**४. स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि विश्वासार्हता** – लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे एका छोट्या खोलीत राहून परीक्षांची तयारी करतात. मात्र, पेपर फुटीमुळे त्यांच्या कष्टावर पाणी फेरले जाते. त्यामुळे परीक्षांमध्ये पारदर्शकता आणून त्यांची विश्वासार्हता टिकवून ठेवावी.

**५. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची जबाबदारी आणि उत्तरदायित्व** – परीक्षांमधील गोंधळामुळे लाखो विद्यार्थी प्रचंड मानसिक दबावाखाली आहेत, तर काहींनी टोकाचे पाऊल उचलले आहे. या सर्व परिस्थितीला प्रशासनाने जबाबदार धरून विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे.

### अनोखे आंदोलन आणि घोषणाबाजी

या आंदोलनात शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, पालक आणि तरुण व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेक आंदोलकांनी चेहऱ्यावर कॉक्रोचचे (झुरळाचे) मास्क लावले होते आणि हातात फुले घेतली होती. आंदोलनस्थळी तरुणांनी “धर्मेंद्र प्रधान, राजीनामा द्या!” अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. तसेच आंदोलनात “जय भीम”च्या घोषणाही देण्यात आल्या. सोशल मीडियावरून सुरू झालेली ही चळवळ आता थेट रस्त्यावर उतरल्याने केंद्र सरकारवरील दबाव वाढण्याची शक्यता आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांचा नेतान्याहूंवर अविश्वास? इस्रायल हेरगिरी करत असल्याचा संशय?

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धाला तब्बल तीन महिने उलटले आहेत, पण या तीन महिन्यांच्या कालावधीत या युद्धाबाबत अद्याप देखील कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. युद्धविरामाची घोषणा करण्यात आलेली असल्यामुळे सध्या युद्ध सुरू नसलं तरी तणाव कायम आहे.**



मध्य पूर्वेतील या तणावामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणाऱ्या जागतिक व्यापाराला मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत आणि याचाच परिणाम जगातील अनेक देशांवर होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि इराणमध्ये शांतता करारासाठी चर्चा सुरू आहेत, पण अद्याप दोन्ही देशात शांतता करारातील अटींवर एकमत झालेलं नाही. या घडामोडी घडत असतानाच काही दिवसांपूर्वी इराण युद्धावरून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे प्रमुख बिन्यामिन नेतान्याहू यांच्यात मतभेद निर्माण झाल्याची माहिती समोर आली होती. एवढंच नाही तर “मी नसतो तर तुम्ही तुरुंगात असता”, अशा शब्दांत डोनाल्ड ट्रम्प यांनी बिन्यामिन नेतान्याहू यांना सुनावलं देखील होतं.

त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प आणि बिन्यामिन नेतान्याहू यांच्यातील मतभेद आणखी वाढल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कारण इस्रायल हेरगिरी करत असल्याचा अमेरिकेला संशय असल्याचं वृत्त समोर आलं आहे. इस्रायलच्या दौऱ्यादरम्यान अमेरिकी अधिकारी बर्नर फोन वापरत आहेत. त्यामुळे अमेरिकेच्या पेंटागॉनला इस्रायलकडून अमेरिकी अधिकाऱ्यांच्या हेरगिरीची भीती वाटतेय का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या संदर्भातील वृत्त एनबीसी न्यूजच्या हवाल्याने इंडिया टुडेनी दिलं आहे.

वृत्तानुसार, एका अहवालानुसार, खबरदारीचा उपाय म्हणून अमेरिका अधिक काळजी घेत आहे. तसेच इस्रायलच्या दौऱ्यादरम्यान अमेरिकेचे अधिकारी बर्नर फोन, तात्पुरतं संगणक आणि विशेषतः उच्चस्तरीय भेटींच्या दरम्यान अधिक काळजी घेत आहे.

### इस्रायलच्या गुप्तचर माहिती गोळा करण्याच्या क्षमतेबद्दल चिंता व्यक्त

इराणबरोबरच्या युद्धाच्या भविष्यातील वाटचालीवरून डोनाल्ड ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यातील वाढत्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही आठवड्यांत काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यामध्ये डीआयएने (DIA) एक अंतर्गत सूचना जारी करत त्यामध्ये ७ पानांचा एक दस्तऐवज जोडला आहे. त्यामध्ये इस्रायलच्या गुप्तचर माहिती गोळा करण्याच्या क्षमतेबद्दल चिंता व्यक्त करण्यात आल्याचं म्हटलं आहे.

# करिअरचे स्वातंत्र्य..



बॅडमिंटनपटू प्रकाश पदुकोण यांनी त्यांची कन्या दीपिका पदुकोण हिच्या करिअर निवडीबाबत महत्त्वाचा खुलासा केला आहे. दीपिकावर त्यांनी कधीही बॅडमिंटन खेळण्यासाठी कोणताही दबाव टाकला नाही, असे स्पष्ट करत त्यांनी आजच्या पालकांना मुलांच्या संगोपनाबाबत एक मोलाचा सल्ला दिला आहे. प्रकाश पदुकोण यांनी आपल्या दोन्ही मुलींबद्दल, त्यांच्या संगोपनाबद्दल आणि करिअरबद्दल माध्यमाशी बातचीत केली. पदुकोण यांना दीपिका आणि अनिशा दोन मुली आहेत. दीपिका सिनेसृष्टीती तर अनिशाने गोल्फ खेळात करिअर घडवले आहे. पदुकोण यांनी सांगितले की, त्यांनी कशाप्रकारे आपल्या दोन्ही मुलींना स्वतःचे करिअर निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आणि स्वतःच्या अपेक्षा कधीच त्यांच्यावर लादल्या नाहीत. मुलांच्या आवडीनिवडीबद्दल बोलताना पदुकोण म्हणाले, "एखादी गोष्ट तुम्हाला फक्त आवडते आणि त्या गोष्टीबद्दल मनात प्रचंड उत्कटता असणं, यात फरक आहे. जर एखाद्या मुलाला खरोखरच संगीत, खेळ किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात मनापासून रस असेल, तर ती मुले त्यासाठी काहीही करायला तयार असतात; पालकांनी नेमकी हीच गोष्ट ओळखली पाहिजे. अशी मुले सतत त्याच गोष्टीत रमत असतात, त्यासाठी तासनतास घालवतात, सकाळी लवकर उठतात आणि रात्री उशिरापर्यंत कष्ट करतात. पालकांनी मुलांच्या या आवडीचे बारीक निरीक्षण करून त्यांना योग्य ते प्रोत्साहन दिले पाहिजे. जर मुलांच्या मनासारख्या गोष्टी घडल्या नाहीत, तरी आजच्या तरुण पिढीला अवघ्या काही वर्षांतच स्वतःहून समजते की त्यांच्यासाठी काय योग्य आहे आणि काय नाही. पण जर तुम्ही त्यांना सुरुवातीलाच कधी संधी दिली नाही, तर ते आयुष्यात काय साध्य करू शकले असते, हे पालकांना किंवा स्वतः मुलाला कधीच कळणार नाही. दीपिकाच्या बालपणातील आठवणींना उजाळा देत पदुकोण म्हणाले की, दीपिका जेव्हा किशोरवयीन होती, तेव्हा ती राज्य पातळीवर बॅडमिंटन खेळायची. परंतु, तिचे मन नेहमीच मॉडेलिंग आणि चित्रपटांमध्ये रमत असे. दीपिका जेव्हा दहावीत होती, तेव्हा तिने स्पष्ट शब्दांत घरच्यांना सांगितले की, तिला बॅडमिंटन सोडून मॉडेलिंग आणि चित्रपटांमध्ये आपले करिअर करायचे आहे.



# कॉकटेल 2 लवकरच..

शाहिद कपूर, कृती सेनन आणि रश्मिका मंदाना अभिनीत 'कॉकटेल २' या चित्रपटाचा ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन होमी अदजानिया यांनी केले आहे, ज्यांनी २०१२ मध्ये आलेल्या मूळ 'कॉकटेल' चित्रपटाचेही यशस्वी दिग्दर्शन केले होते. जरी हा नवीन चित्रपट पहिल्या 'कॉकटेल'ची थेट कथा पुढे नेत नसला, तरी त्याची मूळ संकल्पना नातेसंबंध, मैत्री आणि प्रेमाच्या गुंतागुंतीच्या समीकरणांवरच आधारित आहे. मात्र, यावेळी प्रेक्षकांना चित्रपटात पूर्णपणे नवीन कलाकार आणि एक वेगळीच रंजक कथा पाहायला मिळणार आहे. ट्रेलरमध्ये शाहिद, कृती आणि रश्मिका यांच्या पात्रांमधील बदलणारे नातेसंबंध आणि भावविश्व दाखवले आहे. चित्रपटाची कथा एका अशा आधुनिक लव्ह ट्रँगलभोवती फिरते, जिथे मैत्री आणि प्रेमाच्या सीमा अस्पष्ट होऊ लागतात. या चित्रपटाची कथा तरुण जैन आणि लव रंजन यांनी मिळून लिहिली आहे. चित्रपटाला संगीत प्रीतमने दिले असून, गीते अमिताभ भट्टाचार्य यांनी लिहिली आहेत. विशेष म्हणजे, ट्रेलरमध्ये पहिल्या चित्रपटातील सैफ अली खानवर चित्रित झालेले 'तुम्ही हो बंधू' हे कमालीचे लोकप्रिय गाणे नव्या रुपात परत आल्याचेही दिसते. या चित्रपटाची निर्मिती दिनेश विजान आणि लव रंजन यांनी केली आहे.

# तापसीचा कमबॅक



बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नूने जवळपास वर्षभर सोशल मीडियापासून दूर राहिल्यानंतर पुन्हा डिजिटल विश्वात पुनरागमन केले आहे. या कमबॅकनंतर चाहत्यांनी तिच्या अचानक गायब होण्याबाबत प्रश्न विचारले असता, तापसीने यामागील कारणांबाबत मोठा खुलासा केला आहे. सोशल मीडियावरील सततचा दबाव, ट्रेंड्सची शर्यत आणि कायम सक्रिय राहण्याची अपेक्षा. या गोष्टींमुळे ती मानसिकदृष्ट्या थकली होती. त्यामुळे पडद्यावरील नव्हे तर खऱ्या आयुष्यातील स्वतःला वेळ देण्याचा निर्णय तिने घेतला. त्यामुळे ती सोशल मीडियापासून अलिप्त राहिली. खरंतर तापसी सोशल मीडियावर कमी सक्रिय झाल्यानंतर मित्र आणि चाहत्यांकडून 'सगळं ठीक आहे ना?', 'तू कुठे गायब झालीस?' असे प्रश्न काळजीपोटी विचारण्यात आले. सोशल मीडियावर परतल्यानंतर तापसीने स्पष्ट केले की, तिचे सोशल मीडियावरील अकाउंट कोणतीही व्यावसायिक टीम हाताळत नाही. ती त्यासाठी कोणालाही पैसे देत नाही. तिचे सोशल मीडिया प्रोफाइल तिच्या खऱ्या आयुष्यासारखेच नैसर्गिक आणि अनफिल्टर्ड आहे. तिने सांगितले की, आजच्या काळात अनेक कंपन्या आणि ब्रँड्स सोशल मीडियावर सतत सक्रिय असलेल्या कलाकारांनाच प्राधान्य देतात. त्यामुळे कमी पोस्ट केल्यामुळे काही ब्रँड्सनी तिच्यासोबत काम करण्यास नकार दिला. जाहिराती हे कलाकारांसाठी महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन असले तरी सोशल मीडिया आता केवळ मार्केटिंगचे माध्यम बनल्याची खंतही तिने व्यक्त केली. या प्रवृत्तीवर टीका करत तापसी म्हणाली, "जर एखादा ब्रँड माझी निवड माझ्या व्यक्तिमत्त्वासाठी करत असेल, तर त्यांच्यासाठी मला दुसऱ्याच व्यक्तीसारखे वागण्याची गरज का भासावी? मग माझी स्वतःची ओळख कुठे राहते?" तापसीने सोशल मीडिया वापरण्याच्या अतिरेकावरही भाष्य केले. "इन्स्टाग्राम उघडल्यावर माणूस वेडा होऊ शकतो. सोशल मीडिया म्हणजे तुम्हाला आत खेचून घेणाऱ्या ब्लॅक होलसारखा आहे. त्यामध्ये स्वतःचा समतोल टिकवून ठेवण्यासाठी मोठ्या मानसिक शक्तीची गरज असते." तापसीने सांगितले की, सोशल मीडियापासून दूर राहण्याचा निर्णय तिने कोणताही गाजावाजा न करता स्वतःच्या मनःशांतीसाठी घेतला होता. सतत नवीन ट्रेंड्सच्या मागे धावण्यापेक्षा तिला वास्तव आयुष्याचा आनंद घ्यायचा होता. त्यामुळे तिने आपल्या फोनमधून सर्व सोशल मीडिया ॲप्स हटवले.

# वर्ल्डकप जिंकून देणाऱ्या कर्णधाराला डच्चू

## मुंबई इंडियन्सचे दिग्गज 'त्रिकूट' संघाबाहेर; नवा कर्णधार नवी टीम

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**८ मार्च २०२६ म्हणजे दोन महिन्यांपूर्वी सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय संघाने घरच्या मैदानावर टी२० वर्ल्डकप जिंकला. २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वातील संघाचा भाग असणाऱ्या सूर्यकुमारने नेतृत्वगुण सिद्ध केले आणि भारताने टी२० जेतेपद आपल्याकडेच राखलं. दोन महिन्यांनंतर सूर्यकुमार यादवला भारतीय टी२० संघाच्या कर्णधारपदावरून बाजूला करण्यात आलं आहे. आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी त्याची संघातही निवड करण्यात आलेली नाही.**




दोन वर्ल्डकपविजेत्या संघाचा भाग असलेला खेळाडू अवघ्या काही महिन्यात कर्णधार आणि खेळाडू नकोसा होणं अजब आहे. सूर्यकुमारची कारकीर्द खाचखळग्यांनी भरलेली आहे.

डोमेस्टिक क्रिकेटमध्ये दशकभर खेळल्यानंतर ३०व्या वर्षी सूर्यकुमारने भारतासाठी पदार्पण केलं. त्यावेळी सूर्यकुमारच्या बाबांचा किस्सा चर्चेत आला होता. 'ज्या ज्या वेळी भारतीय संघाची एखाद्या मालिकेसाठी घोषणा होत असे तेव्हा बाबा सगळ्या वेबसाईट्स वाचून काढत. माझं नाव निवडलेल्या संघात नाही हे समजल्यावर ते मला कॉल करत. त्यांना आणि मला वाईट वाटत असे पण हरकत नाही, कधीतरी निवड होईलच असं मी सांगत असे', असं सूर्यकुमारने सांगितलं होतं.

टी२० प्रकारात पदार्पण करताना इंग्लंडच्या जोफ्रा आर्चरच्या वेगवान चेंडूवर नटराज शॉट खेळत सूर्यकुमारने षटकार लगावून सुरुवात केली होती. अक्रॉस जाऊन फाईनलेग क्षेत्रात चेंडू भिरकावून देण्याची त्याची शैली अर्थात सुपला शॉट प्रचंड लोकप्रिय झाला. अवघ्या वर्षभरात ३१व्या वर्षी सूर्यकुमारने टी२० प्रकारात शतक झळकावलं.

३२व्या वर्षी सातत्यपूर्ण खेळासह त्याने आयसीसीच्या जागतिक टी२० क्रमवारीत अव्वल स्थानी झेप घेतली. टी२० क्रमवारीत ९०० गुणांची कमाई करणारा तो पहिला खेळाडू ठरला होता. त्यावर्षी आयसीसीच्या वर्षातील सर्वोत्कृष्ट टी२० खेळाडू म्हणून त्याची निवड झाली होती.

पुढच्या वर्षी पुन्हा एकदा सर्वोत्कृष्ट टी२० खेळाडू म्हणून त्याची निवड झाली. २०२४ टी२० वर्ल्डकप फायनलमध्ये सूर्यकुमारने डेव्हिड मिलरचा अफलातून असा झेल टिपला होता. वर्ल्डकपविजेत्या संघाचा तो अविभाज्य भाग होता. ३३व्या वर्षी सूर्यकुमारची टी२० संघाच्या कर्णधारपदी निवड झाली. ३४व्या वर्षी सूर्यकुमारच्या नेतृत्वातच भारताने आशिया चषकाच्या जेतेपदावर नाव कोरलं.

### सूर्यकुमारच्या नेतृत्वात टी२० वर्ल्डकपच्या जेतेपदावर कब्जा

३५व्या वर्षी सूर्यकुमारच्या नेतृत्वात भारतीय संघाने टी२० वर्ल्डकपच्या जेतेपदावर कब्जा केला. वर्ल्डकपमध्ये अमेरिकेविरुद्धच्या सलामीच्या लढतीत सूर्यकुमारने नाबाद ८४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली. मात्र त्यानंतर त्याच्या बॅटमधून निघणाऱ्या धावा आटल्या. टी२० वर्ल्डकपनंतर झालेल्या आयपीएल स्पर्धेतही सूर्यकुमारची बॅट तळपलीच नाही. यंदा आयपीएलमध्ये सूर्यकुमारने १३ सामन्यात मिळून २७० धावा केल्या. मुंबई इंडियन्सची कामगिरी यथातथाच राहिली. संघातील वरिष्ठ खेळाडू म्हणून सूर्यकुमारकडून मोठ्या खेळींची अपेक्षा होती. मात्र त्याला लौकिकाला साजेसा खेळ करता आला नाही.

### सगळ्या परिस्थितीत चांगलं नेतृत्व केलं

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील दुरावलेल्या संबंधामुळे आशिया चषकात वातावरण संवेदनशील होतं. भारतीय संघाने पाकिस्तानच्या खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला होता. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्या हस्ते जेतेपदाचा करंडक स्वीकारण्यास भारताने नकार दिला. भारतीय संघ जेतेपदाविना माघारी परतला होता. सूर्यकुमारने या सगळ्या परिस्थितीत चांगलं नेतृत्व केलं होतं.

# वैभव सूर्यवंशीने अखेर मोडला सचिन तेंडुलकरचा ३६ वर्षांचा विक्रम

**महाईन्यूज । मुंबई**

**आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासह आगामी आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात डावखुरा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीची निवड झाली आहे. अवघ्या १५व्या वर्षी टीम इंडियात स्थान मिळवणारा तो भारताचा सर्वात युवा खेळाडू ठरला आहे. यासह त्याने सचिन तेंडुलकरचा तब्बल ३६ वर्षांपासून अबाधित असलेला विक्रम मोडला आहे.**



वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६ मध्ये धडाकेबाज कामगिरी करत ७७६ धावा केल्या. तब्बल २३७.३० च्या स्ट्राइक रेटसह त्याने स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज म्हणून ऑरेंज कॅपही पटकावली. विशेष म्हणजे, एका आयपीएल हंगामात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावावर केला. यासाठी त्याने ख्रिस गेलचा दीर्घकाळ टिकून असलेला विक्रम मोडला. त्याच्या या कामगिरीमुळे भारतीय संघातील निवड जवळपास निश्चित मानली जात होती.

निवड समितीने श्रेयस अय्यर यांची भारताच्या नव्या टी-२० कर्णधारपदी नियुक्ती केली आहे. आयर्लंड आणि इंग्लंड मालिकांसह आशियाई क्रीडा स्पर्धेतही ते संघाचे नेतृत्व करणार आहेत. टी-२० विश्वचषक विजेता कर्णधार सूर्यकुमार यादव यांना मात्र संघातून वगळण्यात आले आहे. मधल्या फळीतील फलंदाज टिळक वर्मा यांच्याकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

भारतीय टी-20 संघाची घोषणा करताना निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनीही सूर्यवंशीच्या कामगिरीचे कौतुक केले. त्याच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करणे अशक्य असल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. आगरकर म्हणाले, "इतक्या कमी वयात स्पर्धात्मक आणि दबावाच्या वातावरणात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणे ही मोठी गोष्ट आहे. तो सामन्याचा चेहरामोहरा बदलू शकणारा खेळाडू आहे. त्याच्याकडून आम्हाला मोठ्या अपेक्षा आहेत." ते पुढे म्हणाले, "टी-20 क्रिकेटमध्ये प्रचंड स्पर्धा असतानाही त्याने आपल्या कामगिरीच्या जोरावर स्वतःची निवड निश्चित केली आहे."

भारतीय संघात निवड झाल्यानंतर वैभव सूर्यवंशीसमोर आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये स्वतःची छाप पाडण्याचे मोठे आव्हान असणार आहे. आयपीएलमधील आक्रमक फलंदाजी आणि सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याच्याकडून चाहत्यांच्या अपेक्षा अधिक उंचावल्या आहेत. आगामी आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यात त्याच्या कामगिरीकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागलेले असेल.

### सचिनचा विक्रम मोडण्याची संधी

भारताचा संघ २६ आणि २८ जून रोजी आयर्लंडविरुद्ध दोन टी-२० सामने खेळणार आहे. त्यानंतर १ ते ११ जुलैदरम्यान इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाईल. वैभव सूर्यवंशीला या मालिकांमध्ये संधी मिळाल्यास तो भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा सर्वात युवा पुरुष क्रिकेटपटू ठरेल. यापूर्वी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. सचिनने १५ नोव्हेंबर १९८९ रोजी पाकिस्तानविरुद्ध कराची येथे वयाच्या १६ वर्षे २०५ दिवसांत कसोटी पदार्पण केले होते. २६ जून रोजी आयर्लंड विरूद्ध बेलफास्ट येथे पहिला टी-२० सामना होणार आहे. यामध्ये सुर्यवंशीला संधी मिळाली तर सचिन तेंडुलकरपेक्षा सुमारे १ वर्ष आणि ११४ दिवस लहान वयात पदार्पण करणारा सर्वात तरूण खेळाडू ठरणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। रविवार ।

दि. 07 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# आकुर्डी परिसरात केबलचे जाळे; सुरक्षिततेचाही प्रश्न ऐरणीवर

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनातर्फे शहर स्वच्छ, सुंदर व विकसनशील 'स्मार्ट सिटी' ठेवण्यासाठी अनेक विविध प्रकल्प व उपाययोजना राबविल्या जातात. वास्तवात मात्र उपनगरे स्मार्ट सिटीऐवजी केबल सिटीच्या विळख्यात अडकलेली दिसून येत आहेत. शहराचे विद्रुपीकरण करण्यासाठी आणि खासगी व्यावसायिक व कंपन्यांकडून शहरांमध्ये अगणित स्वरूपात अनधिकृतपणे केबलचे जाळे पसरवले जात आहे. याला एक प्रकारे प्रशासनच जबाबदार असल्याची भावना नागरिकांत आहे.

शहरातील बहुतांश सर्व रस्त्यांवरील पथदिवे, उड्डाणपूल, उंच इमारती, टॉवर, चौकातील उंच खांब, आता तर चौकातील वाहतूक सिग्नल व सीसीटीव्ही कॅमेऱ्यावरच्या खांबावरसुद्धा अनधिकृतरित्या केबल टाकलेल्या दिसून येत आहेत. यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडण्याऐवजी विकृती व विद्रुपीकरणाला हातभार लागत आहे. मात्र, या केबलच्या जाळ्याकडे प्रशासनाकडून डोळेझाक करून सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते की काय, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

### यांच्याकडून होतेय विद्रुपीकरण

विनापरवाना व अनधिकृतरित्या ब्रॉडबँड सर्व्हिस, वाय-फाय, सीसीटीव्ही, दूरदर्शन वाहिन्या या सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांकडून उपनगरांमध्ये खांब, इमारती, बस स्टॉप, उड्डाणपूल, गृहनिर्माण संस्था, शाळा- महाविद्यालये शासकीय अस्थापनांच्या इमारतीवर विनापरवाना केबलची जाळे विस्तारले जात आहे. यामधून आणि अनेक वेळा केबलसेवा पुरवठाधारकांमध्ये सीमावाद निर्माण होऊन अंतर्गत वाद निर्माण झाला आहे.

> निगडी, विठ्ठलवाडी, आकुर्डी, रावेत, वाल्हेकरवाडी या वाढत्या लोकवस्तीच्या परिसरामध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात या केबलचे जाळे वाढत आहे. अनेक खासगी गृहनिर्माण संस्थेच्या छतावर अनधिकृतपणे केबल टाकल्यामुळे इमारतीच्या छतावर लहान मुले, महिला यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्युत केबल ज्या प्रमाणे भूमिगत केली आहे त्याप्रमाणे या सर्व केबल भूमिगत कराव्यात.
>
> **- प्रमिला भेंडवळकर,** सामाजिक कार्यकर्त्या, निगडी.





D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW

D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# ताथवडेत वनराई.. १० लाख झाडे लावण्याचा संकल्प..!

## ६५ हजार क्यूसेक कार्बन कमी होणार; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**खासदार श्रीरंग बारणे आणि शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांच्या सहकार्यातून ताथवडे येथे वनराई उभारण्यात येत आहे. येथे आतापर्यंत आठ लाख देशी झाडे लावली आहेत. दहा लाख झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात झाडे लावल्यानंतर भविष्यात ६५ हजार क्यूसेक कार्बन कमी होईल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.**



'जागतिक पर्यावरण दिना'चे औचित्य साधून शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र, ताथवडे येथे 'ओरिएअर्थ निसर्ग फाउंडेशन'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वृक्षरोपण सोहळ्याला खासदार बारणे यांची प्रमुख उपस्थिती होती. युवासेना पश्चिम महाराष्ट्र सचिव तथा नगरसेवक विश्वजीत बारणे, शिवसेना वैद्यकीय कक्ष पिंपरी-चिंचवड शहरप्रमुख श्रीकांत नवले, शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र ताथवडेचे सहाय्यक आयुक्त उपेंद्र गायकवाड, प्रशासन अधिकारी दैवशाली चव्हाण, कृषी अधिकारी राजवर्धन घोगरे, कुंदन हुंडाईचे एमडी हितेश चड्डा, ओरिएअर्थ निसर्ग फाउंडेशनचे अध्यक्ष जीवन शेवाळे, डॉ. विनायक चौव्हाण, सी आर रामास्वामी, अक्षय मोहोळकर, आदित्य इंगळे आणि रेवन काकडे उपस्थित होते. 'ओरिएअर्थ निसर्ग फाउंडेशन'ने पाच वर्षे झाडे जगवण्याची जबाबदारी घेतली आहे.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, आठ लाख झाडांची लागवड केली आहे. कुंदन हुंडाईच्या सीएसआर फंडातून झाडांची लागवड केली आहे. दहा लाख झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात झाडे लावल्याने ६५ हजार क्यूसेक कार्बन कमी होईल. कार्बन कमी करणारी देशी जातीची झाडे आहेत. महापालिकेची शहरात २०३ उद्याने आहेत. या उद्यानात मोठ्या प्रमाणात झाडे लावली आहेत. ही झाडे जगवण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. झाडांची केवळ लागवड करणे पुरेसे नाही, तर त्यांची योग्य निगा राखणे आणि त्यांना जगविणे हे प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

पर्यावरणाचे रक्षण ही एका दिवसाची जबाबदारी नसून ती आपल्या जीवनशैलीचा भाग असायला हवी. सर्वांनी पृथ्वीला अधिक हिरवेगार बनवण्याचा निश्चय करावा. वाढत्या शहरीकरणात निसर्गाचा समतोल राखण्यासाठी केवळ झाडे लावणे नव्हे, तर त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, असे नगरसेवक विश्वजीत बारणे म्हणाले.

### शहर प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प..

सामाजिक बांधिलकीतून शहर स्वच्छ ठेवणे, कचरा न करणे आणि पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी देखील आहे. ग्लोबल वार्मिंगचे मोठे संकट आहे. हवा, पाणी प्रदूषण वाढत आहे. हे टाळने नागरिकांच्या हातात आहे. प्लास्टिकमुक्त शहर व्हावे अशी इच्छा आहे. शहरातून वाहणारी पवना, इंद्रायणी नदी स्वच्छ व्हावी. नागरिकांना स्वच्छ पाणी मिळावे. शहर प्रदूषण मुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन पुढाकार घ्यावा, असे आवाहन खासदार बारणे यांनी केले.

# वीजसमस्या सोडवण्यासाठी नगरसेविका कविता भोंगाळे यांचा पुढाकार!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भोसरीतील प्रभाग क्रमांक ५ मधील गंगोत्री पार्क, महादेवनगर, सावंतनगर, श्रीकृष्ण मंदिर परिसर तसेच जयदीप पार्क या भागांमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाने होणारा वीजपुरवठा आणि अचानक वीज जाण्याच्या समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या गंभीर प्रश्नाची दखल घेत भाजपा नगरसेविका कविता भोंगाळे यांनी भाजपा नेते आमदार महेशदादा लांडगे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी या विषयावर सकारात्मक चर्चा झाली असून नागरिकांना दिलासा देणाऱ्या उपाययोजनांबाबत आश्वासक भूमिका समोर आली आहे.**



सदर परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. नवीन गृहनिर्माण प्रकल्प, निवासी सोसायट्या, व्यावसायिक आस्थापना तसेच घरगुती वीज वापरात सातत्याने वाढ होत आहे. मात्र, वाढत्या मागणीच्या तुलनेत विद्यमान वीज यंत्रणा सक्षम नसल्याने तेथील वितरण ट्रान्सफॉर्मरवर (डी. पी.) अतिरिक्त ताण येत आहे. परिणामी वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, लो-व्होल्टेजची समस्या निर्माण होणे आणि अनेकदा तासन्तास वीजपुरवठा विस्कळीत राहणे, अशा समस्या निर्माण होत आहेत.

नगरसेविका कविता भोंगाळे यांनी आमदार लांडगे यांना दिलेल्या निवेदनात या भागातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत असलेल्या परिणामांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे निर्माण होत असून ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. तसेच किरकोळ व्यावसायिक, दुकानदार आणि सेवा व्यवसायांनाही वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे आर्थिक फटका बसत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

याशिवाय वारंवार होणाऱ्या व्होल्टेजच्या चढ-उतारामुळे घरगुती वीज उपकरणांचे नुकसान होण्याचा धोका वाढला असून अनेक नागरिकांनी याबाबत तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे या प्रश्नावर तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे नगरसेविका भोंगाळे यांनी बैठकीत स्पष्ट केले.

आमदार महेशदादा लांडगे यांनी नागरिकांच्या अडचणींची गांभीर्याने दखल घेत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. वाढत्या वीजभाराचा विचार करून सदर परिसरासाठी नवीन डी.पी. मंजूर करण्याबाबत सकारात्मक पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले. नागरिकांना दर्जेदार आणि अखंडित वीजपुरवठा मिळणे ही प्राथमिकता असून त्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले.



"गंगोत्री पार्क, महादेवनगर, सावंतनगर, श्रीकृष्ण मंदिर परिसर आणि जयदीप पार्क या भागातील नागरिक वारंवार होणाऱ्या वीजखंडितता आणि लो-व्होल्टेजच्या समस्येमुळे त्रस्त आहेत. विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच याचा फटका बसत आहे. या प्रश्नाच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी मी आमदार महेशदादा लांडगे यांची भेट घेऊन नवीन डी.पी. मंजूर करण्याची मागणी केली आहे. आमदारांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला असून संबंधित विभागाकडे तातडीने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे. नागरिकांना दर्जेदार आणि अखंडित वीजपुरवठा मिळावा, यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरू राहील."

**- कविता भोंगाळे, नगरसेविका, भाजपा.**

### नागरिकांच्या अपेक्षा...

नगरसेविका कविता भोंगाळे या स्थानिक पातळीवरील विविध नागरी समस्यांबाबत सातत्याने पाठपुरावा करत असून वीजपुरवठ्याच्या प्रश्नासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार नागरिकांसाठी महत्त्वाचा ठरत आहे. आमदार महेशदादा लांडगे यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे या भागातील वीजप्रश्न लवकरच मार्गी लागेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. नवीन डी.पी. मंजूर होऊन ती कार्यान्वित झाल्यास गंगोत्री पार्क, महादेवनगर, सावंतनगर, श्रीकृष्ण मंदिर परिसर आणि जयदीप पार्क भागातील हजारो नागरिकांना वारंवार होणाऱ्या वीजखंडिततेपासून मोठा दिलासा मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

# सुदर्शन नगर अंडरपासमधील अपघात रोखा

## बीआरटीएस मार्गावर तातडीने उपाययोजनांची नाना काटे यांची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपळे गुरव येथील सुदर्शन नगर चौकाजवळील '८ टू ८० गार्डन' परिसरातील अंडरपासमध्ये वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक नाना काटे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.**






नाशिक फाटा ते हिंजवडी बीआरटीएस मार्गावरील सुदर्शन नगर चौकात विकसित करण्यात आलेल्या अंडरपासमध्ये सामान्य वाहतुकीसाठी स्वतंत्र रस्ता आणि बीआरटीएससाठी स्वतंत्र मार्गिका आहे. नियमानुसार या मार्गिकेत केवळ अत्यावश्यक सेवांची वाहनेच प्रवेश करू शकतात. मात्र, प्रत्यक्षात अनेक खासगी वाहने या मार्गाचा वापर करत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप नाना काटे यांनी केला आहे.

विशेषतः अंडरपासमधील बीआरटीएस मार्गात तीव्र वळण (शार्प टर्न) आणि अपुरा प्रकाश असल्याने वाहनचालकांचा अंदाज चुकून गंभीर अपघात घडत आहेत. या ठिकाणी आतापर्यंत अनेक नागरिकांना जीव गमवावा लागला असून गेल्या आठवड्यातच तीन अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये दोन नागरिकांचा मृत्यू झाला असून २१ वर्षीय आयान अयाज शेख याचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

या पार्श्वभूमीवर नाना काटे यांनी महापालिका प्रशासनाला निवेदन देत अंडरपासमधील अपघात रोखण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. बीआरटीएस मार्गात खासगी वाहनांचा प्रवेश रोखण्यासाठी सुरक्षा रक्षक नेमावेत, आवश्यक ठिकाणी प्रकाशयोजना वाढवावी, इशारा फलक व सुरक्षाव्यवस्था उभारावी तसेच भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या मार्गावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.




## ब्ल्यू डायमंड स्पावर छापा; दोन पीडित महिलांची सुटका

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने वाकड येथील एका स्पावर धडक कारवाई करत वेश्याव्यवसायासाठी वापरल्या जात असल्याचा संशय असलेल्या दोन पीडित महिलांची सुटका केली. या प्रकरणी स्पा चालक आणि मॅनेजरविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून महिला मॅनेजरला अटक करण्यात आली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाकडमधील भामासेंटर येथे असलेल्या ब्ल्यू डायमंड रिलॅक्सो स्पा येथे ५ जून रोजी सायंकाळी छापा टाकण्यात आला. स्पाच्या नावाखाली अवैध वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले. याप्रकरणी स्पा चालक मारुती मुरडे आणि मॅनेजर वैशाली चव्हाण यांच्याविरोधात हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने यावर्षी आतापर्यंत १६ आस्थापनांवर छापे टाकून कारवाई केली आहे. यामध्ये ११ स्पा, ४ हॉटेल आणि एका ऑनलाइन माध्यमाचा समावेश आहे. या कारवाईत एकूण ३८ आरोपींना अटक करण्यात आली असून ३७ पीडित महिलांची सुटका करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, पोलीस आयुक्तांनी २०२६ मध्ये अवैध वेश्याव्यवसायाशी संबंधित चार आस्थापना एक वर्षासाठी बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामध्ये तीन स्पा आणि एका हॉटेलचा समावेश आहे. अशा प्रकारच्या कारवायांविरोधात भविष्यातही अधिक तीव्र मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

## देहूरोड येथील केंद्रीय विद्यालय, ऑर्डनन्स फॅक्टरी येथे भुयारी मार्ग होणार; खासदार श्रीरंग बारणे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**देहूरोड निगडी रस्त्यावर केंद्रीय विद्यालय व देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी या दरम्यान दोन भुयारी मार्ग (अंडरपास) मंजूर झाले आहेत. या भुयारी मार्गाचे काम सुरू करण्यास सदन कमांड ब्रिगेडियर आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाने तत्वतः मान्यता दिली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेले भुयारी मार्गाचे काम सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे मावळचे शिवसेना श्रीरंग बारणे यांनी सांगितले.**



देहूरोड येथील सदन कमांड येथे एनचआय एमएसआरडीसी, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड , देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी प्रतिनिधी आणि ब्रिगेडर यांच्या प्रमुख आधिकारी व संबंधित विभागाचे प्रमुख यांच्या बरोबर विविध प्रश्नांसंदर्भात खासदार बारणे यांनी शनिवारी आढावा बैठक घेतली. सदन कमांड ब्रिगेडियर आशिष कटोज, कर्नल अमित श्रीवास्तव, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हेमंत यादव, एमएसआरडीसीचे उपअभियंता विकास पिंपळकर, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य कैलास पानसरे, शिवसेना देहूगाव शहर प्रमुख सुनिल हगवणे, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष राजेंद्र तरस, ऑर्डनन्स फॅक्टरी देहूरोड एम्प्लॉय युनियन अध्यक्ष मोहन घुले उपस्थित होते. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील प्रलंबित प्रश्न, चालू असलेली कामे याचा आढावा घेण्यात आला.

खासदार बारणे म्हणाले, देहूरोड निगडी रस्त्यावर केंद्रीय विद्यालय व देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी या दरम्यान दोन भुयारी मार्ग मंजूर झाले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून एमएसआरडीसीकडून भुयारी मार्गाला मान्यता मिळाली आहे. या भुयारी मार्गाचे काम सुरू करण्याबाबत चर्चा झाली. त्याला सदन कमांड ब्रिगेडियर आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाने तत्वतः मान्यता दिली. त्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेले काम सुरू होईल. काळोखे मळा ते हगवणे वस्तीदरम्यानचा रस्ता संरक्षण विभागाच्या जागेतून जातो. रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावरील खड्डे तत्काळ बुजविण्यात येणार आहेत.

श्री संत तुकाराम महाराजांची पालखी पुढील महिन्यात पंढरपूरला जाणार आहे. पालखी मार्ग संरक्षण विभागाच्या जागेतून जातो. या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. या रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दुरुस्ती करण्यात येणार आहे. त्याला ब्रिगेडियर यांनी मान्यता दिली आहे. किवळे येथील महावितरणची लाईन संरक्षण विभागातून जात आहे. त्याबाबतही बैठकीत चर्चा झाल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

PRIYADARSHANI
GROUP OF SCHOOLS


# BLOOD DONATION CAMP

## IN THE LOVING MEMORY OF
## LATE SMT. NAVAL INDRAMAN SINGH JI

# BE A HERO TODAY !

Join Our Blood Donation Drive


June 13, 2026
10:00 AM – 3:00 PM



Priyadarshani School Moshi.
Gat No: 195, Dehu Alandi
Road Boratewadi Moshi

## WHY YOU SHOULD DONATE BLOOD

One donation can save three lives. Stay healthy, spread kindness. Your blood makes a difference.




9890613333
pgosm05@gmail.com